दैनिक
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे Email : newsaksharaj2021@gmail.com

● वर्ष ०२ रे ● अंक ०९ वा ● पाने ०४ ● किंमत : ३ रुपये ● ठाणे, शुक्रवार, दि.०१ नोव्हेंबर २०२४ ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023
● YEAR : 02 ● ISSUE : 09 ● PAGES : 04 ● PRICE RS. : 03 ● THANE, Friday, 01 November 2024 ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

सर्व नागरिकांना दीपावली तसेच पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...!

भाजपाचं नाही...

महायुतीचं सरकार येणार : देवेंद्र फडणवीस

अक्षराज : प्रतिनिधी

दि.३१, मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी नुकतंच विधानसभा निवडणुकीबाबत मोठं विधान केलं होतं. निकालानंतर राज्यात महायुतीचं सरकार येईल आणि पुढचा मुख्यमंत्री भाजपाचा होईल, असे राज ठाकरे म्हणाले होते.

एबीपी न्यूज वृत्तवाहिनीला मुलाखत देत असताना राज ठाकरे यांनी हे विधान केल्यानंतर महायुतीमध्ये थोडी अस्वस्थता पाहायला मिळाली. अखेर आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर भाष्य केलं आहे. काँग्रेसचे मुंबईतील नेते रवी राजा यांच्या पक्षप्रवेशानिमित्त आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

भाजपाचं नाही तर महायुतीचं सरकार येणार

मी राज ठाकरेंचा आभारी आहे. त्यांच्या शुभेच्छा नम्रपणे स्वीकारतो. पण महाराष्ट्रात भाजपाचं सरकार येणार नसून महायुतीचं सरकार येणार आहे आणि महायुतीचाच मुख्यमंत्री असेल, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. देवेंद्र फडणवीस माहिम विधानसभा मतदारसंघाबाबत बोलताना म्हणाले की, महायुतीमध्ये आमची अजून बोलणी सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज ठाकरे, मुंबईचे आमचे अध्यक्ष आशिष शेलार चर्चा करत आहोत. आम्ही सर्व एकत्र राहोत, यासाठी मार्ग काढला जात आहे.

राज ठाकरेंनी आता व्यापक भूमिका स्वीकारली

राज ठाकरे हे उघडपणे भाजपाला पाठिंबा देत आहेत. त्यामुळे उत्तर भारतीयांचे मत भाजपापासून दूर जाईल का? असाही एक प्रश्न यावेळी देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला. यावर ते म्हणाले की, लोकसभेलाच याबद्दल मी बोललो आहे.

राज ठाकरे यांनी आता व्यापक हिंदुत्वाची भूमिका स्वीकारली आहे. तसेच इतर पक्षांच्या प्रादेशिक भूमिकांचे तर आम्ही नेहमीच स्वागत करत आलो आहोत. प्रादेशिक अस्मितेबरोबरच राष्ट्रीय अस्मिताही स्वीकारणे गरजेचे असते. राष्ट्रीय अस्मिता म्हणजेच हिंदुत्व आणि हे राज ठाकरेंनी स्वीकारले आहे.

दोन दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या महिलेचा निर्घृण खून ; मृतदेहाचे केले सहा तुकडे

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.३१, जोधपूर : राजस्थानच्या जोधपूर येथून दोन दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या ५० वर्षीय ब्युटिशियन महिलेचा मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत आढळून आला आहे. एका प्लास्टिक पिशवीत महिलेचा मृतदेह आढळला आहे. सदर महिलेच्या मृतदेहाचे सहा तुकडे केले असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीने आपल्या घराशेजारीच महिलेचा मृतदेह पुरला होता. दिवाळीच्या दिवसात मृत महिलेच्या कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. तसेच संशयित आरोपी गुल मोहम्मद यानेच हा खून केला असल्याचे आरोपीच्या पत्नीने सांगितले असून पोलीस गुल मोहम्मद नावाच्या आरोपीचा शोध घेत आहेत.

२८ ऑक्टोबर रोजी मृत महिला अनिता चौधरी बेपत्ता झाली होती. तिच्या ब्युटी पार्लर जवळून दुपारच्या दरम्यान ती हरवली. संध्याकाळपर्यंत घरी न परतल्यामुळे दुसऱ्या दिवशी तिचा पती मनमोहन चौधरीने जोधपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत गुलामुद्दीन उर्फ गुल मोहम्मदवर पोलिसांना संशय आला. अनिता चौधरी यांचे ब्युटी पार्लर असलेल्या इमारतीमध्येच गुलचेही दुकान आहे. दोघेही एकमेकांना ओळखत होते. पीडित महिलेच्या कॉल डिटेल्समधूनच पोलिसांना गुल मोहम्मदवर संशय आला होता. सरदारपुरा पोलीस ठाण्यातील अधिकारी दिलीप सिंह राठोड यांनी सांगितले की, बेपत्ता होण्यापूर्वी अनिताने दुकानाबाहेरून रिक्षा पकडली होती. पोलिसांनी सदर रिक्षावाल्याचा शोध घेऊन चौकशी केली असता त्याने सांगितले की, पीडित महिलेला आरोपीच्या घराजवळ सोडले होते. पोलिसांनी जेव्हा आरोपी गुल मोहम्मदचे घर गाठले, तेव्हा गुल मोहम्मदची पत्नी घरी होती. तिने सांगितले की, ती तीन दिवस तिच्या बहिणीच्या घरी गेली होती.



बहिणीच्या घरून परतल्यानंतर मोहम्मदने तिला अनिताबद्दल सांगितले. तिला मारून तिचा मृतदेह प्लास्टिक पिशव्यात घराच्या मागे पुरला आहे. पोलिसांनी बुलडोझर बोलावून घराच्या मागे १२ फुटांचा खड्डा खणल्यानंतर त्यांना छिन्नविछिन्न अवस्थेतील मृतदेह आढळून आला.

मृत महिला अनिताच्या मुलाने सांगितले की, मोहम्मदने त्याच्या आईची फसवणूक करून तिचा खून केला. पीडित महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. तसेच पोलिसांनी जोधपूरमध्ये ठिकठिकाणी छापा टाकून आरोपीचा शोध सुरू केला आहे.

दिवाळीतील हवा अन् ध्वनिप्रदूषणावर नजर !

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.३१, पुणे : दिवाळीच्या काळात फटाक्यांमुळे हवा प्रदूषण आणि ध्वनिप्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होते. या प्रदूषणावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ बारकाईने लक्ष ठेवणार आहे. दिवाळीत ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर या दोन दिवसांत पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील १२ ठिकाणी ध्वनिप्रदूषणाची नोंद करण्यात येणार आहे. याचवेळी सहा ठिकाणी हवा प्रदूषणाची नोंदी घेतल्या जाणार आहेत.

मागील काही काळापासून हवा प्रदूषणासोबतच ध्वनि प्रदूषणाची वाढ होत आहे. दोन्ही शहरांचा विस्तार सुरू असून, अनेक ठिकाणी बांधकाम प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पांमुळे मोठी धूळ निर्माण होऊन हवा प्रदूषणात वाढ होत आहे. त्यातच वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यानेही हवा प्रदूषणात भर पडत आहे. वाहनांची संख्या जास्त असल्याने त्यांच्या आवाजानेही ध्वनिप्रदूषण वाढत आहे. याचबरोबर सामाजिक, राजकीय आणि धार्मिक कार्यक्रमात मोठ्या आवाजात ध्वनिवर्धक लावण्यात येत असल्यानेही ध्वनिप्रदूषणात वाढ होत आहे. शहरातील हवा आणि ध्वनिप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढलेले असताना दिवाळीच्या काळात फटाक्यांमुळे त्यात आणखी भर पडते. फटाक्यांच्या धुरामुळे हवेची पातळी विषारी बनते.

याचवेळी त्यांच्या मोठ्या आवाजामुळे लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास होता. सातत्याने मोठा आवाज कानावर पडल्याने बहिरेपणाचा धोका निर्माण होतो. या सर्व गोष्टींचा विचार करून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिवाळीच्या काळात हवा आणि ध्वनिप्रदूषणाच्या नोंदी घेतल्या जातात. या नोदींच्या आधारे शहरातील प्रदूषणाचा तुलनात्मक अभ्यास शक्य होतो.

खा.निलेशजी लंके
ग्रामपंचायत टाकळी ढोकेश्वर ता.पारनेर जि.अहमदनगर
सर्व नागरिकांना
दीपावली तसेच पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा...!
मा.प्रदीप खिलारी
अरुणा प्रदिप खिलारी
(सरपंच)
बी. एम. दावभट
(ग्रामविकास अधिकारी)

लैंगिक अत्याचारातून गर्भवती राहिलेल्या ११ वर्षांच्या मुलीला दिलासा

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.३१, मुंबई : लैंगिक अत्याचारातून गर्भवती राहिलेल्या ११ वर्षांच्या मुलीला ३० व्या आठवड्यांत गर्भपात करण्याची परवानगी उच्च न्यायालयाच्या सुट्टीकालीन खंडपीठाने गुरुवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४ रोजीदिली. जराही वेळ न दवडता गुरूवारीच या मुलीवर गर्भपाताची प्रक्रिया करण्यात यावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.लैंगिक अत्याचारातून ही गर्भधारणा झाली असल्याने ती संपवू देण्याच्या मागणीसाठी या अल्पवयीन मुलीने वडिलांमार्फत उच्च न्यायालयात याचिका केली होती. कायद्याने २० व्या आठवड्यापर्यंत गर्भपाताची परवानगी आहे. त्यानंतर, गर्भपात करायचा असल्यास उच्च न्यायालयाची परवानगी घेणे अनिवार्य आहे. न्यायालय तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानंतर गर्भपात करण्याची परवानगी देते किंवा नाकारते. न्यायमूर्ती शर्मिला देशमुख आणि जितेंद्र जैन यांच्या सुट्टीकालीन खंडपीठाने या मुलीची मागणी मान्य करताना उपरोक्त आदेश दिले. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता आणि लैंगिक अपराधांपासून मुलांचे संरक्षण (पोक्सो) कायद्यांतर्गत अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, वैद्यकीय समाप्ती कायद्यात नमूद केल्यानुसार आपत्कालिन परिस्थितीत २० आठवड्यांच्या गर्भधारणेच्या कालावधीपेक्षा जास्त असलेल्या गर्भधारणेची वैद्यकीय समाप्ती करण्याची परवानगी दिली जाऊ शकते. याचिकाकर्ती मुलगी अल्पवयीन असून लैंगिक अत्याचाराची पीडित आहे. तिची सगळी पार्श्वभूमी लक्षात घेता तिला ३० व्या आठवड्यांत वैद्यकीय प्रक्रियेद्वारे गर्भधारणेची समाप्ती करण्याची परवानगी दिला जात असल्याचे न्यायालयाने म्हटले. फौजदारी खटल्याच्या सुनावणीदरम्यान आवश्यक असलेल्या डीएनए किंवा इतर चाचण्या करण्यासाठी गर्भाच्या रक्तासह अन्य महत्त्वाचे नमुने घेण्याचे तसेच ते जतन करण्याचे आदेशही न्यायालयाने सरकारला दिले. गर्भपाताच्या प्रक्रियेदरम्यान बाळ जिवंत असेल तर त्याचा जीव वाचवण्यासाठी सर्व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, याशिवाय, बाळ जिवंत जन्माला आले आणि याचिकाकर्ता किंवा तिचे पालक मुलाची जबाबदारी घेण्यास इच्छुक नसतील किंवा ते त्या स्थितीत नसतील तर, राज्य सरकार मुलाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारेल हेही न्यायालयाने स्पष्ट केले.

सर्व नागरिकांना
दीपावली तसेच पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा...!
शुभ
दीपावली
अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
विनोद कैलास गोरे
संपादक अक्षराज मीडिया
प्राजक्ता चव्हाण गोरे
सहसंपादिका अक्षराज मीडिया
अक्षराज मीडिया संपादक मंडळ व सर्व पत्रकार टीम

बोईसरमध्ये अज्ञात वस्तूचा स्फोट; चार जण जखमी

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.३१, बोईसर : बोईसरजवळील सरावली अवध नगर येथील चाळीत रात्री उशिरा एका अज्ञात वस्तूचा स्फोट होऊन परिसर हादरला. या स्फोटात चार जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्फोटाची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपासाला सुरुवात केली आहे.

बोईसर जवळील सरावली ग्रामपंचायत हद्दीमधील अवध नगर परिसरात असलेल्या अलशिफा गल्लीतील दुबे चाळीमधील एका खोलीत बुधवारी रात्री अकरा वाजेच्या सुमारास भीषण स्फोट झाला. या स्फोटामुळे खोलीच्या भिंती कोसळल्या असून आजूबाजूच्या घरांचे देखील नुकसान झाले आहे. स्फोटाची माहिती मिळताच बोईसर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी झालेल्या चार जणांना रुग्णालयात हलवले. सुरुवातीला हा स्फोट सिलेंडरमुळे झाल्याचा संशय होता, मात्र अधिक तपासात खोलीतील कपाटातील संशयास्पद वस्तू किंवा फ्रिजच्या कॉम्प्रेसरचा स्फोट झाल्याचे प्रथम दर्शनी शक्यता व्यक्त करण्यात येत असून त्या दृष्टीने रात्री उशिरा घटनास्थळी वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी भेट देऊन पाहणी करून अधिक तपासासाठी फॉरेन्सिक टिमला पाचारण करण्यात आले आहे.

सर्व नागरिकांना
दीपावली तसेच पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा...!
दीपावली शुभचिंतन
उदय गणपत दणदणे
दैनिक अक्षराज प्रतिनिधी : ठाणे व गुहागर
पत्रकार/लेखक/ सामाजिक कार्यकर्ता
संघटक/सदस्य/ प्रसिद्धी प्रमुख : नमन लोककला संस्था
(कार्यक्षेत्र- भारत) मध्यवर्ती-मुंबई
प्रसिध्दी प्रमुख: कलगी तुरा समाज उन्नती मंडळ-मुंबई (महाराष्ट्र)

संत सेना महाराज
सर्व नागरिकांना
दीपावली तसेच पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा...!
शुभ दीपावली
श्री. संजय पंडित
(ठाणे प्रतिनिधी अक्षराज मीडिया)
नाभिक समाज कार्यकर्ता

सर्व नागरिकांना
दीपावली तसेच पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा...!
सेवा श्रध्दा समन्वितः
आशुतोष नरहरी बारकुल
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
कल्याण
रमेश कल्लूरकर
सहाय्यक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
कल्याण

संपादकीय

मानवतेचा दीप लावू !

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा असो वा झोपडीत राहणारा प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान ममुलेच नाही तर भावा - बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण - भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली होती. सुदैवाने यावेळी दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी करता येणार आहे. त्यामुळे लोकांच्या उत्साहाला उधाण आले आहे. या वर्षी महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झालेला नाही उलट वाढलाच आहे. हा उत्साह पुढे देखील असाच कायम राहणार आहे कारण दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा, प्रसन्नतेचा उत्सव आहे.

दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....!

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत.

गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

चला तर मग दीन दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू.

किल्ले बांधण्याची प्रथा जपायला हवी !

गडकोट किल्ले हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक ठेवा आहे. शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या सवंगडी मावळ्यांच्या पराक्रमांच्या आणि त्यागाच्या खुणा असलेले हे किल्लेच आपले खरे वैभव आहे. प्रत्येक गड किल्यांच्या स्वतंत्र इतिहास असून या प्रत्येक गड किल्ल्याने जसा येथील भूमिपुत्रांचा पराक्रम आणि वैभव अनुभवले आहे, तशा परकीयांकडून दिल्या गेलेल्या हाल अपेष्टाही भोगल्या आहेत. छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाची आठवण म्हणून गेल्या काही वर्षांत दिवाळीच्या काळात किल्ले बांधण्याची प्रथा राज्यात सुरु झाली. दिवाळीचा आणि किल्ले बांधण्याच्या प्रथेचा तसा काही संबंध नसला तरी त्यानिमित्ताने बालमनावर पराक्रमाचे, स्वाभिमानाचे आणि त्यागाचे संस्कार निर्माण होण्यास मदत होते. उभारलेल्या किल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीसह अष्टप्रधान मंडळ आणि मावळे यांच्या प्रतिकृती ठेवल्या जातात ज्या शिवरायांच्या आदर्श राज्यकारभाराची जाणीव करून देतात. त्यामुळे या प्रथेचे जतन करणे आवश्यक आहे; आजमितीला किल्ले बनवण्याची प्रथा राज्यातील काही भागांमध्येच जिवंत असलेली पाहायला मिळते. हल्लीची पिढी ही मैदानी खेळांपेक्षा मोबाईल, टी.व्ही. आणि व्हिडीओ गेम्सच्या दुनियेत हरवणारी आहे. तिला यातून बाहेर काढायचे असेल, तर तिला अशा काही प्रथांची माहिती करून द्यायला हवी. जेणेकरून मुलांच्या कलागुणांना वाव तर मिळेलच शिवाय त्यांच्यामध्ये आपल्या इतिहासाविषयी प्रेम निर्माण होऊन पराक्रमाचे आणि नीतिमत्तेचे संस्कार होण्यास मदत होणार आहे.

- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई

आली आली दिवाळी

आली आली दिवाळी तसे आम्हाला दिवाळीचे वेध दिवाळीच्या आधी महिना पंधरा दिवस अगोदरच लागून जायचे. मग सगळ्यांची आकाश कंदील तयार करण्याची जय्यद तयारी चालू व्हायची, त्यासाठी बांबू आणून त्याच्या कामट्या करणे मग त्या एकमेकांना दोऱ्याने बांधून सुंदर आकाशकंदील तयार व्हायचा. त्यावेळी त्यात लाईट लावला जात नसे तर आतमध्ये पणती ठेवायला एक चौकोन तयार केला जात असे . अशा तऱ्हेने निरनिराळ्या आकाराचे आकाशकंदील जसे विमान, पंचकोनी चांदणी, षटकोनी चांदणी तयार केले जायचे. त्यानंतर त्याला पारदर्शक रंगीत कागद किंवा ताव चिकटवला जाई. अशा घरी केलेल्या आकाशकंदील यामुळे मुलांची कलात्मकता वाढीस लागत होती. आणि त्यामुळे एक आत्मिक समाधान मिळायचे.त्यात खूपच मजा यायची आणि आनंद मिळायचा.

जसजशी दिवाळी जवळ येऊ लागते तसतसे फटाक्यांचे दुकाने थाटली जात, त्यावेळी दिवाळीची सुटी एकवीस दिवस असायची. मग खिशात अगदी एक आणा असला तरी टिकल्याची डबी घेऊन टिकल्या फोडत बसायचा छंद लागायचा. त्यावेळी टिकल्याचा रोल अस्तित्वात आलेला नव्हता टिकल्याची एक छोटी गोल डबी असायची त्यावर खारुताईचे चित्र असायचे. आत लाल कुंकवाच्या टिकलीच्या आकाराएवढ्या टिकल्या असायच्या ह्या टिकल्या फोडण्यासाठी एक सपाट पट्टिसारखी एक बंदूक असायची. काही जण स्वयंपाक घरातील चिमट्यात टिकली ठेवून तो चिमटा दगडावर जोरात आपटला की टिकली फुटायची, नाहीतर सगळ्या टिकल्या एका कागदावर ओतून तो कागद पेटवून द्यायचो मग सगळ्या टिकल्या एका मागोमाग पटापट फुटायच्या. काही शूर वीर बोटाच्या चिमटीत टिकली ठेवून फरशीवर जोरात घासून टिकल्या फोडायचे, त्याचे मात्र खूपच अप्रूप वाटायचे.

दिवाळी आणखी जवळ येवू लागली की घरात बायकामुलींची धांदल उडायची. आई चकलीचे पीठ करण्याची तयारी करायची , संजोर्याचे सारण तयार करणे अशी कामे सुरू व्हायचे. संपूर्ण वातावरण दिवाळी येणार या कल्पनेने भारावून जात असे. कुंभार पणत्या करण्यात मग्न होत असत. त्यावेळी रंगीबेरंगी कलात्मक पणत्यांचा जन्म झालेला नव्हता. कुंभार दारोदार फिरून साध्याचं पणत्या अगदी शेकड्याने विकत असतं. हळू हळू दिवस पुढे सरकत जायचे, तसतशी दिवाळी कधी येईल असे होऊन जायचे. बहिणी, मुली रांगोळ्यांची पुस्तके शोधून कोणत्या दिवशी कोणती रांगोळी काढायची हे ठरवून ठेवीत.त्यावेळी आजसारखे रांगोळीचे छापे नव्हते त्यामुळे मुलींच्या कलेचे कसब पणाला लावले जाई. शेजारच्या अंगणातील रांगोळीचे सुद्धा कौतुक केले जायचे. भला तेरी रांगोळी मे रांगोलीसे अच्छी कैसे? असा प्रश्न कधीच पडत नसे. रांगोळीचे ठिपके सरळ रेषेत यावे म्हणून एका चौकानी कागदाला सरळ उभे आडवे ठिपके उदबत्ती ने छिद्रे पाडून एक ठिपक्यांच्या कागद तयार केला जायचा, बहुतेक हे काम भावांवर सोपवले जायचे. बहीण भाऊ मित्र अगदी खेळीमेळीने दिवाळीच्या तयारीला लागत.सर्व मिळून किल्ले बनवले जाई.

वाट पाहता पाहता दिवाळी जवळ यायची. प्रथम गाय गोऱ्हयांची बारस ,त्या दिवशी दारापुढे गाय आणि वासरू आणून त्याची पूजा केली जायची. त्यानंतर धन त्रयोदशी ही बहुतेक व्यापारी मंडळी वही पूजन, दागिने ठेवून पूजा करत असत. आणि मग त्यानंतर लक्ष्मीपूजन त्या दिवशी मुलांच्या उत्साहाला उधाण आलेले असायचे. पहाटे अभ्यंग स्नानापास न सुरवात व्हायची. आई सर्वांना पहाटे उठवून देई, काही वेळ पहाटे उठायचे जीवावर यायचे कारण पांघरूण काढताच अंगात थंडी भरायची, पण उठल्यावर मात्र खूप मजा यायची. जो कोणी सूर्योदय झाल्यावर अंघोळ करेल तो नरकात पडेल ही समजूत मनावर पक्की ठसलेली असायची. त्यावेळी आमचे मन खूपच निष्पाप, निर्मळ होते. मीठ सांडायचे नाही, सांडले तर डोळ्याच्या पापणीने भरावे लागते, दिवाळीत सूर्योदयापूर्वी अंघोळ केलीच पाहिजे नाहीतर नरकात जाणार ह्या समजुती वर ठाम विश्वास होता.

पापणी ने सांडलेले मीठ कसे उचलता येईल हा विचार सुद्धा मनाला कधीच शिवला नाही. मग पहाटेच्या त्या कडाक्याच्या थंडीत गरम पाण्याने अंघोळी व्हायच्या. आंघोळीच्या अगोदर आम्हाला पाटावर बसवून पाटाभोवती रांगोळी काढून अंगाला तेल लावले जाई. तेल म्हणजे खोबरेल तेलात चार थेंब अत्तर किवा सुगंधी तेल मिसळले जाई. आई आम्हाला पाटावर बसवून हाता पायांना तेल लावून पाठीला, छातीला तेल लावून देई, छातीला तेल चोळताना खूपच गुदगुल्या होऊन आम्ही हसत राहायचो तेव्हा मित्र गप्प बैस हे ऐकावे लागायचे. मग त्यानंतर अंघोळीला बसायचे, अंगाला उटणे लावल्याशिवाय अंघोळ होतं नसे, अर्धी अंघोळ झाली की आई ताम्हणात निरांजन घेऊन आम्हाला कुंकू लावून ओवळत असे, त्यावेळी थंडीने दात कडकड वाजत असे. बाथरूम बाहेर एखादे लहान भावंड हातात फुलबाजी लावून ओवाळत म्हणत असे , दिन दीन दिवाळी गाय म्हशी ओवाळी, गाइम्हशी कोणाच्या, लक्ष्मणाच्या..... असे गाणे म्हणत बसे.

पण अभ्यंग स्नान फक्त मुले आणि पुरुष यांनाच करणे बंधनकारक असे, मुलींना मात्र सूट असायची त्यावेळी मला नेहमी प्रश्न पडे मग मुली का नरकात जातं नाही ? हा प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहे. अंघोळ करून बाहेर येताच शेव, चकली तळण्याचा खमंग वास घरात दरवळत असे, मग काय फराळावर ताव मारायला सूरवात व्हायची. शेव, चकल्या भरभर संपवून शंकरपाळी खिशात कोंबून आम्ही बाहेर धूम ठोकायची. बाहेर कालचे न फुटलेले फटाके वेचून दारू काढणे अन् टिकल्या फोडण्यात दिवस भरकन निघून जायचा.मात्र लक्ष्मीपूजनाच्या दिवशी संध्याकाळी मजा यायची. सर्व बहीण भावांडाना समोर बसवून फटाके वाटले जायचे. त्यात जास्त करून लवंगी फटाके, फुलबाज्या, कोठ्या, भुईचक्कर जास्त असायचे. लवंगी फटाक्याची लड आम्हीच कधीच लावली नाही, तर त्यातले सगळे फटाके मोकळे करून एक एक फ टाका फोडण्यात मजा यायची. मोठे भावंड मात्र सुतळी बॉम्ब, रॉकेट फोडायचे.

सुतळी बॉम्ब लावताना उदबत्ती ने पेटवयचा कारण फुलबाजीने तो पेटला आहे की नाही हे समजायचे नाही. सुतळी बॉम्ब फोडतांना सर्व चिल्ले पिल्ले कानावर हात घट्ट धरून ठेवीत, अन् तो फुटेपर्यंत सस्पेन्स असायचा. लवकर फुटला नाही तर दादा हळूच दबक्या पावलाने एक एक पाऊल पुढे जायचा अन् वात विझली आहे ना ? याची खात्री करूनच पुन्हा पेटवायचा. रॉकेट एका काचेच्या बाटलीत ठेवून उडविले जाई पण ते नेमके तिरपे उडून समोरच्या घराच्या भिंतीवर धडकायचे. लक्ष्मी पूजेनंतर दुसरा दिवस पाडव्याचा. तरीही त्या दिवशी सकाळी फुसके फटाके वेचून त्यातली दारू कागदावर काढून ती पेटवायची हा उद्योग असायचाच.

पाडव्याला आई ठेवणीतल्या साडीतील एखादी छान साडी नेसून, गजरा माळून तयार व्हायची, त्यावेळी मला ती साक्षात लक्ष्मीचं भासायची. संध्याकाळी बाबांना ओवाळताना त्यांनी तबकात टाकलेले शंभर रुपये पाहून तिच्या ओठावर जे स्मित हास्य उमटायचे ते मी आयुष्यात कधीच विसरू शकलो नाही. आता जाणवते किती अल्पसंतुष्ट आणि समाधानी होती नाही तेव्हाची पिढी! आज आम्हाला खंडीभर मिळाले तरी समाधान होतच नाही. त्यानंतर भाऊबीज यायची . खणाचे परकर पोलके घालून ताई मला ओवालायची तिच्या तबकात बाबांनी दिलेली दहाची नोट टाकायची, मग दुसऱ्या भावाने तीच नोट परत तबकात टाका यची. ते पैसे घेऊन ती आनंदाने पळायची, त्यावेळी तिला त्या दहा रुपयाचे मोल किती आहे हे देखील समजायचे नाही. किती साधे, सोपे अन् सरळ दिवस होते नाही ते! नव्हती स्पर्धा, नव्हता दिखावा होते फक्त प्रेम प्रेम आणि प्रेम...... आज मात्र मला माझ्या मुलांच्या, नातवांच्या हरवलेल्या बालपणाची खंत वाटते. आज आपण प्रत्येक सणातला आनंद, उत्सुकता, मजा घालवून बसलो आहे. छोट्या छोट्या गोष्टीत सुद्धा किती आनंद भरलेला असतो हे आपण शोधतच नाही.

- स्वामी दळवी
नऱ्हेगाव पुणे,
९८२२२६९०९८

।। जगभरात बचतीचा प्रचार ।।

जागतिक बचत दिवसाची स्थापना दि.३१ ऑक्टोबर १९२४ रोजी इटलीतील मिलान येथे पहिल्या आंतरराष्ट्रीय बचत बँक कॉंग्रेस- वर्ल्ड सोसायटी ऑफ सेव्हिंग्ज बँक्स दरम्यान करण्यात आली. इटालियन प्रोफेसर फिलिपो रविझा यांनी हा दिवस कॉंग्रेसच्या शेवटच्या दिवशी आंतरराष्ट्रीय बचत दिवस

म्हणून घोषित केला. थ्रिफ्ट कॉंग्रेसच्या ठरावांमध्ये जागतिक काटकसरी दिन हा दिवस जगभरात बचतीच्या प्रचारासाठी समर्पित करण्याचा निर्णय घेण्यात आला. काटकसरीला चालना देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमध्ये , बचत बँकांनी शाळा, पाद्री, तसेच सांस्कृतिक, क्रीडा, व्यावसायिक आणि महिला संघटनांच्या पाठिंब्याने काम केले.

पोर्सिलेन पिगी बँक, जर्मनी : सन १९७०पासून २९ देशांच्या प्रतिनिधींना जगभरातील लोकांच्या मनात बचत करण्याचा विचार आणायचा होता आणि त्याची अर्थव्यवस्था आणि व्यक्तीशी संबंधितता होती. जागतिक बचत दिवस सामान्यतः ३० ऑक्टोबर रोजी आयोजित केला जातो ज्या देशांमध्ये हा दिवस सार्वजनिक सुट्टी असतो, कारण बँका खुल्या ठेवण्याची कल्पना आहे, जेणेकरून लोक त्यांच्या बचती त्यांच्या खात्यात हस्तांतरित करू शकतील.

जागतिक काटकसर दिनाची कल्पना कशातूनच जन्माला आलेली नाही. जीवनाचा उच्च दर्जा मिळविण्यासाठी आणि अर्थव्यवस्था सुरक्षित करण्यासाठी पैसे वाचवण्याच्या कल्पनेला वचनबद्ध असलेल्या दिवसांची काही उदाहरणे आहेत, उदाहरणार्थ स्पेनमध्ये जिथे सन १९२१मध्ये पहिला राष्ट्रीय काटकसर दिवस साजरा करण्यात आला किंवा युनायटेडमध्ये राज्ये. जर्मनीसारख्या इतर देशांमध्ये, सन १९२३च्या जर्मन आर्थिक सुधारणांमध्ये त्यांच्यापैकी बऱ्याच जणांनी बचत गमावल्यामुळे बचतीवरील लोकांचा आत्मविश्वास पुनर्संचयित करावा लागला .

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक काटकसरीचा दिवस चालू राहिला आणि सन १९५५ ते १९७० या काळात तो लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचला. काही देशांमध्ये ही व्यावहारिकदृष्ट्या एक खरी परंपरा बनली. ऑस्ट्रियामध्ये उदाहरणार्थ, सेव्हिंगचे अधिकृत शुभंकर, तथाकथित स्पेरेफ्रोह-लिट. हॅपी सेव्हर, किंवा त्याऐवजी आनंदाने बचत करा! प्रजासत्ताक राष्ट्राध्यक्ष आणि अगदी रस्त्यापेक्षा ब्रँड जागरुकतेची उच्च पातळी गाठली. त्याचे नाव देण्यात आले. सन १९७०च्या दशकात स्पेरेफ्रो-जर्नल, तरुण लोकांसाठी एक शैक्षणिक मासिक, ४ लाख प्रतींचा प्रसार झाला. आजकाल जागतिक बचत दिनाचे आयोजन करणाऱ्या बँकांचे लक्ष विकसनशील देशांवर केंद्रित आहे, जिथे बरेच लोक बँकिंग रहित आहेत. या देशांमध्ये बचत वाढवण्यात बचत बँका महत्त्वाची भूमिका बजावतात, जसे की

गरीबांच्या बचत खात्यांची संख्या दुप्पट करण्यासाठी अशासकीय संस्थांसोबत काम करणे यासारख्या काही मोहिमा आणि उपक्रमांसह प्रयत्नशील आहेत.

आज 'जागतिक बचत दिन'. इटालियन प्राध्यापक 'फिलिपो रॅव्हिझा' यांनी हा दिवस 'आंतरराष्ट्रीय बचत दिन' म्हणून जाहीर केला. दि.३१ ऑक्टोबर १९२४ रोजी हा दिवस मिलानो, इटली येथील पहिल्या 'आंतरराष्ट्रीय कॉंग्रेस बचत बँक दरम्यान स्थापित करण्यात आला. जागतिक बचत दिन हा जगभर ३१ ऑक्टोबरला साजरा केला जातो. भारतामध्येही पूर्वी हा दिवस ३१ ऑक्टोबरलाच साजरा होत असे. परंतु १९८४ साली दिवंगत पंतप्रधान इंदिराजी गांधी यांचे ३१ ऑक्टोबरलाच निधन झाल्यामुळे त्यानंतर भारतामध्ये जागतिक बचत दिन ३० ऑक्टोबरला साजरा केला जाऊ लागला. प्रथम वर्ल्ड सेविंग डे सन १९२५मध्ये साजरा करण्यात आला. त्यात स्पेन व अमेरिकेत प्रथम राष्ट्रीय बचत दिन साजरा केला गेला. चांगले जीवनमान मिळविण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेची घडी सुरळीत चालण्यासाठी पैसे वाचवणे महत्वाचे आहे. त्याच अनुषंगाने जागतिक बचत दिवस अनेक देशांमध्ये खूप लोकप्रिय आहे आणि या आकर्षणाचे कारण म्हणजे बचत करण्यामध्ये सहसा अनेक अडथळे असतात.

जागतिक बचत दिन आपल्याला नियमित बचत करण्याचे फायदे सांगतो. बचत एखाद्या व्यक्तीस एखादा व्यवसाय सुरू करणे, चांगल्या आरोग्य सेवेचा लाभ घेणे, चांगले शिक्षण मिळविणे किंवा घर खरेदी करणे यासारख्या गोष्टींमध्ये मदत करतो. विल रॉजर तर असं म्हणतात, कर्ज काढून उद्याच्या पगारावर जगणाऱ्या अभिनेत्याच्या संगती पेक्षा, कालच्या बचतीवर भागवणाऱ्या द्वारपालची संगत मी पसंत करेन. त्यामुळे शिक्षण, घर, वृद्धापकाळ अशा कोणत्याही कारणासाठी तुम्हाला पैसा लागणार नसेल तरी निदान तुमच्या आत्मविश्वासासाठी तरी तुम्ही बचत केलीच पाहिजे. तुमच्या बचतीच्या स्थितीवरून तुमची समाजातली पत ठरणार आहे, हे नक्की!

!! आंतरराष्ट्रीय बचत दिनानिमित्त सर्वांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

– संकलन व सुलेखन –
श्री.कृष्णकुमार निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सअॅप– ९४२३७१४८८३

अक्षराज कविकट्टा

लक्ष्मी वारस..

पवित्र शुभ दायक
अश्विन वद्य अवस
महत्व पूर्ण दिवाळी
लक्ष्मी पूजन दिवस

बहरला रे समृध्दीने
अखिल प्रदेशउद्रस
लक्ष्मीप्रकटे साक्षात
कथा सांगती सुरस

स्वागत करे सुहास्य
नको मातेचा विरस
शुचिर्भूत तन मनही
स्वच्छता अतिसरस

आईला नावडे ईर्षा
उगा अनाठाई हवस
सत्छिलसदाचारपूर्ण
स्नेह भाव हो सकस

चंचल लक्ष्मी स्थिरवे
विसरावे वैर आकस
सुवर्ण वर्षाव होईलं
वृत्ती नसो हिणकस

उचीत विनियोग करे
तो लक्ष्मी पुत्र औरस
औदार्य असो वृत्तीत
सक्षम शोभेल वारस

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

दिवाळी अंक म्हणजे पर्वणीच !

आपल्या देशात दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. आताही देशात दिवाळीची धामधूम सुरू आहे. वेगवेगळ्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या आहेत. सर्वत्र दिवाळीच्या खरेदीची धामधूम सुरू आहे. आकाश कंदील, मिठाई, फटाके, नवीन कपडे, नवीन वाहने, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांच्या खरेदीसाठी दुकाने फुलून गेली आहेत. दिवाळीमुळे सर्वांच्या उत्साहाला उधाण आले आहे. दिवाळी म्हटले की फटाके, आकाशकंदील, पणत्या, नवीन कपडे, नवीन वस्तू असे जे समीकरण आहे तसेच दिवाळी म्हणजे दिवाळी अंक असेही एक समीकरण आहे. दिवाळी आली की वाचकांना वेध लागतात ते दिवाळी अंकाचे आणि वाचकांचे पाय आपसूकच दिवाळी अंकाच्या खरेदीसाठी पुस्तकांच्या दुकानाकडे वळतात. महाराष्ट्रात तर दिवाळी अंकांची परंपरा खूप पूर्वीपासून आहे. १९०९ साली पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध झाला होता त्याचे नाव मनोरंजन असे होते. पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध होऊन आज ११५ वर्ष झाली आहेत. आपल्या राज्यात दरवर्षी विविध विषयांवरची दर्जेदार दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. महाराष्ट्रात जवळपास हजाराच्या जवळपास दिवाळी अंक प्रकाशित होतात. दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी मेजवानीच. कला, क्रीडा, राजकारण, अर्थकारण, विनोद, साहित्य, कथा, कांदबरी, कविता, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आहार, व्यंगचित्र, भविष्य अशा वेगवेगळ्या विषयांवरील दिवाळी अंक वाचणे म्हणणे पर्वणीच. अनेक वृत्तपत्रे वाचकांसाठी दिवाळी अंक काढत असतात. फटाके, मिठाई, फराळ यासमवेतच दिवाळी अंक ही सुशिक्षित आणि साहित्यप्रेमी घरांसाठी एक आवश्यक घटक आहे. कोरोना काळात दिवाळी अंकाच्या छपाईला आणि वितरणाला मर्यादा आल्या होत्या त्यामुळे तुलनेने कमी दिवाळी अंक प्रसिद्ध झाली होती. असे असले तरी काही संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले अंक ऑनलाइन प्रसिद्ध केले होते. वाचकांना ते विविध डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झाले होते. काहींनी आपले अंक पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून दिले होते. वाचकांनी त्याची प्रिंट काढून ते वाचले होते. आता कोरोनाचे दुष्चक्र संपले असल्याने दिवाळी अंकांना पुन्हा एकदा सुगीचे दिवस आले आहेत. यावर्षी अनेक प्रकाशकांनी आपले दिवाळी अंक प्रकाशित केले आहेत. यासोबतच ऑडिओ – व्हिज्युअल दिवाळी अंकही आहे. वाचक पूर्वीच्याच उत्साहाने दिवाळी अंकाचे स्वागत करीत आहे. दिवाळी अंक आपल्या साहित्य संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. दिवाळी अंकामुळे वाचन संस्कृती रुजायला खूप मदत झाली आहे. वाचन संस्कृती रुजवण्यात व नव्या पिढीला वाचन संस्कृतीकडे घेऊन जाण्यास दिवाळी अंकाचा मोठा वाटा आहे. यावर्षी आपण आपल्या मित्र परिवारांना, नातेवाईकांना दिवाळीच्या शुभेच्छा व फराळासोबत दर्जेदार दिवाळी अंक भेट द्यावेत. वाचनाची गोडी वाढवण्यासाठी दिवाळी अंक हा चांगला मार्ग आहे. गोडाधोडाचा फराळासोबतच वाचनाचा हा फराळही दिला तर दिवाळीची गोडी आणखी वाढेल आणि वाचन संस्कृती रुजायलाही मदत होईल.

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

सी-व्हिजिल ॲपवरील तक्रारींचे जलदगतीने निराकरण

अक्षराज : प्रतिनिधी

दि.३१, ठाणे : निवडणुकीच्या दरम्यान काही अनियमितता किंवा आचारसंहिता भंगाविषयी काही बाबी आढळून आल्यास नागरिकांनासी व्हिजिलया ॲप्लिकेशनच्या माध्मातून संदेश, फोटो, व्हिडिओ व्दारे ऑनलाईन तक्रार दाखल करू शकतात. या ॲपवर तक्रार प्राप्त झाल्यापासून १०० मिनिटांच्या आत तक्रारीचे निवारण केले जाते.या अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात दि.३१ ऑक्टोबर २०२४ दुपारी ३:३० वाजेपर्यंत ३४८ तक्रारी प्राप्त झाल्या. या ३४८ तक्रारींमध्ये एकूण ३२४ तक्रारी दखलपात्र असून उर्वरित २४ तक्रारी अदखलपात्र आहेत. या ३२४ दखलपात्र तक्रारींमधून ३०६ तक्रारींचे १०० मिनिटाच्या आत निराकरण करण्यात आले असून उर्वरित तक्रारींचेही निराकरण करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही सुरू आहे. अशी माहिती सी-व्हिजिल कक्षाचे जिल्हास्तरीय समन्वय अधिकारी विजयसिंह देशमुख व सहाय्यक समन्वय अधिकारी सुकेशिनी पगारे यांनी दिली आहे.

प्रेमाच्या जाळ्यात ओढून अत्याचार केल्याच्या दोन घटना उघड

अक्षराज : प्रतिनिधी

दि.३१, पुणे : प्रेमाच्या जाळ्यात ओढून तरुणीवर अत्याचार केल्याच्या दोन घटना विश्रामबाग आणि भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये उघड झाल्या आहेत. त्यापैकी एक मुलगी अल्पवयीन असून या दोन्ही प्रकरणांमध्ये आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी पुण्यात आलेल्या एका तरुणीची ओळख एका तरुणासोबत झाली. तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तरुणाने लग्नासाठी विचारणा केली. त्यानंतर तिला एका भाड्याच्या खोलीवर नेत तिच्या संमतीशिवाय जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी पीडित तरुणीने तक्रार दिल्यानंतर आरोपी तरुण आणि त्याचे चार मित्र यांच्या विरोधात विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डिसेंबर २०२० ते सप्टेंबर २०१४ या दरम्यान हा प्रकार घडला आहे. संबंधित तरुणाने तरुणीशी ओळख वाढवून तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर लग्न करण्याचे भासवून तिला एका खोलीवर बोलावून घेतले. त्यानंतर तिच्या संमतीशिवाय जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. आरोपीच्या मित्रांनी खोलीचा दरवाजा बाहेरून बंद करून त्याला मदत केली. लग्नाची विचारणा केली असता आरोपीने तरुणीला शिवीगाळ आणि मारहाण करून लग्न करण्यास नकार दिला. तसेच आरोपींनी तरुणीला दूरध्वनीद्वारे 'झाले ते कोणाला सांगू नको' असे म्हणून जीव मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी महिला पोलीस उपनिरीक्षक एन. पेंढरकर पुढील तपास करत आहे. 'तुझ्यासोबत लग्न करणार आहे', असे सांगत प्रेमाचे नाटक करून मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही तिच्यासोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित करणाऱ्या तरुणाविरुद्ध भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली आहे. संबंधित तरुणाने दुसऱ्या मुलीसोबत लग्न जमूवून साखरपुडा केला आणि अल्पवयीन मुलीची फसवणूक केली. याबाबत पीडित मुलीने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

विद्यार्थ्यांकडून कुटूंबांपर्यंत पर्यावरण रक्षणाचा संदेश

दि.३१, पनवेल : महापालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांकडून प्रत्येक कुटूंबांपर्यंत पर्यावरण रक्षणासाठी पालिकेने अनेक पाऊले उचलली आहेत. यंदाची दिवाळी पर्यावरणपूरक साजरी प्रत्येक कुटूंबांमध्ये साजरी करावी यासाठी महापालिकेने विद्यार्थ्यांना आवाहन केले आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी माझी वसुंधरा ५.० या योजनेअंतर्गत पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच कामोठे येथील रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम विद्यालयातील विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी मुलांनी काय करावे असे विविध पर्याय मुलांना सूचविण्यात आले. तसेच पर्यावरण विषयावर विद्यार्थ्यांमध्ये रांगोळी स्पर्धा व पर्यावरणपूरक आकाश कंदिल बनविण्याच्या स्पर्धा घेण्यात आली. यावेळी रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवाळीच्या दरम्यान फटाके उडवल्याने मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषणाचे प्रमाण वाढते. त्यामुळे श्वसनदाह आजाराच्या रुग्णांमध्ये वाढ होते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या सूचनेनूसार हरित सण अंतर्गत फटाकेमुक्त दिवाळी, प्रदूषण मुक्त दिवाळी विद्यार्थ्यांनी साजरी करावी यादृष्टीने ही जनजागृती पालिकेने केली आहे. विद्यार्थ्यांनी पुनर्वापर करण्यात येणाऱ्या वस्तू पासून पर्यावरणपूरक आकाश कंदिल बनवून दाखवले.

बनवा उपवासाचे हेल्दी-टेस्टी वरईचे आप्पे

नवरात्रीनिमित्त नऊ दिवस उपवास असल्याने रोज काय बनवयाचे, असा प्रश्न अनेकांना पडतो. त्यात रोज साबुदाणा खिचडी, राजगिऱ्याचा लाडू, रताळे, बटाट्याचे वेफर्स, भगरीची भाकरी, असे तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो. त्यामुळे आम्ही तुम्हाला उपवासाचे अप्पे कसे बनवायचे हे सांगणार आहोत. जे तुम्ही नवरात्रीत उपवास असेल, तर नक्की आजमावून पाहा.

वरईचे आप्पे साहित्य :

- १ कप वरई
- पाव कप साबुदाणा
- ३ कप दही
- जिरे
- मीठ
- हिरव्या मिरचाच ठेचा

वरईचे आप्पे कृती :

- सर्वप्रथम साबुदाणा मिक्सरला दळून घ्यायचा. दळून झाल्यानंतर त्यामध्ये वरई घालून पुन्हा मिक्सरला एकदा फिरवून घ्यावे.
- मग साबुदाणा आणि वरई मिश्रण एका बाउलमध्ये काढून घ्यावे. त्यानंतर त्यामध्ये दही व्यवस्थित मिक्स करून घ्यायचे.
- मग त्यामध्ये एक चमचा जिरे, हिरव्या मिरचीचा ठेचा, चवीनुसार मीठ घालायचे. त्यानंतर मिश्रणात थोडं पाणी घालून ते व्यवस्थित मिक्स करायचं.
- अशा प्रकारे तुम्ही उपवासाच्या आप्प्यांचे पीठ तयार करा. **(टिप – पीठ जास्त पातळं आणि जास्त घट्ट नको)** आप्प्यांचं पीठ तयार झाल्यानंतर ते १५ , २० मिनिटं झाकून बाजूला ठेवून द्यायचे.
- त्यानंतर आप्पे पात्र गरम करून त्यामध्ये तेल सोडा आणि जे बॅटर तयार करून घेतलं आहेत ते आप्पे पात्रात घाला.
- मग झाकणं ठेवून ते २ ते ३ मिनिटे शिजवून घ्यायचे आणि पुन्हा त्यात तेल सोडून दोन्ही बाजूने नीट भाजून घ्यायचे.
- अशा प्रकारे तुमचे उपवासाचे आप्पे तयार सर्वांना सर्व्ह करा.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना ठरणार महायुतीच्या उमेदवारांसाठी 'गेम चेंजर'

अक्षराज : वसंत रांधवण

दि.३१, अहिल्यानगर : मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेमुळे राज्यातील महायुती सरकारला विधानसभा निवडणुकीत मोठे बळ मिळणार असून या योजनेमुळे अहमदनगर जिल्ह्यातील महायुतीच्या उमेदवारांना विधानसभा निवडणुकीत मोठा फायदा होणार असल्याचे दिसून येत आहे. अहमदनगर जिल्ह्यात जवळपास ८ लाख महिलांना या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा फायदा झाला आहे.

त्यामुळे आताच्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना महायुतीसाठी गेम चेंजर ठरणार असल्याचे दिसून येत आहे. लोकसभा निवडणूकीत राज्यात महायुतीला म्हणावे तसे यश प्राप्त झाले नव्हते त्यामुळे महायुतीमध्ये अस्वस्थता पसरली होती. त्यातच विधानसभा निवडणुक होणार असल्याने व नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला घवघवीत यश मिळाल्याने महाविकास आघाडीचे नेते विधानसभा निवडणुकीतही महायुतीचा दारुण पराभव करून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार असे भाकीत करत होते. आणि लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे त्यामध्ये तथ्यही होते. त्यामुळे महायुतीच्या गोटामध्ये अस्वस्थता पसरली होती.

अशा कठीण प्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मध्यप्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रातही मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू केली. या योजनेमुळे तसेच या योजनेला महिलांचा मिळालेला उदंड प्रतिसाद यामुळे राज्यात बॅकफूटवर गेलेली महायुती पुन्हा एकदा फॉर्मात आली. राज्यसरकार केवळ ही योजना जाहीर करून थांबले नाही तर या योजनेसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक महिलांच्या खात्यावर महिन्याला १५०० रुपये याप्रमाणे पाच महिन्याचे ७५०० रुपये जमा केले आहेत. त्यामुळे या महिला महायुतीच्या सरकारवर आज प्रचंड खुष आहेत. याचा फार मोठा परिणाम आताच्या विधानसभा निवडणुकीत पहायला मिळणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी अहमदनगर जिल्ह्यात जवळपास ७ ते ८ लाख महिला पात्र ठरलेल्या आहेत. यातील बहुतांश महिलांच्या खात्यावर ऑक्टोबर महिन्यापर्यंत पैसे जमा झाले आहेत. त्यामुळे या लाडक्या बहिणी निश्चितपणे विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या पाठीशी राहण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणूकीत अहमदनगर जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या उमेदवारांना जास्त मताधिक्य मिळाले होते. वास्तविक पाहता या मतदारसंघात काही महायुतीचे आमदार असताना हे महायुतीसाठी योग्य नव्हते. मात्र त्यावेळी परिस्थितीच तशी विचित्र होती. मात्र आज मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेमुळे ती परिस्थिती राहिली नाही. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे तिकीट मिळावे म्हणून आजपर्यंत अनेकजण प्रयत्न करत होते. मात्र लाडकी बहिण योजनेमुळे व त्या योजनेला महिलांचा मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे महायुतीमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील महायुतीच्या आमदारांनी विधानसभा मतदारसंघात जास्तीत जास्त महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा फायदा व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भाजप, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या तिन्ही पक्षाचे जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना यशस्वी व्हावी यासाठी प्रयत्न केले व मतदारसंघातील जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा फायदा झाला आहे.

दिवाळीला बहुरंग यावा; बेरंग नको!

फटाकेनिर्मितीत वापरल्या जाणाऱ्या रसायनांमुळे अनेक प्रकारचे आजार संभवतात. फटाके फोडल्यामुळे हवा आणि वातावरण दूषित होते. परिणामी श्वसनाचे आजार वाढतात. ध्वनीप्रदूषणाची पातळीही वाढते. मोठ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे श्रवण क्षमता कमी होते. फटाके फोडल्यामुळे कार्बन मोनॅक्साईडसारखे विषारी वायू वातावरणात पसरतात. ओझोनचा थर पातळ होतो. एकदा मराठी विज्ञान परिषदेचा फटाक्यामागील विज्ञान या कार्यक्रमात फटाक्यात वापरल्या गेलेल्या रसायनांबद्दल स्लाईड शो कार्यक्रम दाखवला होता. कॉपरमुळे श्वसननलिकेत त्रास, कॅडमियममुळे किडनीला धोका आणि ॲनेमिया, शिशाचा मज्जासंस्थेवर परिणाम अशा अनेक गोष्टी सांगितल्या होत्या. तपशीलात थोडाफार फरक असू शकतो. अशा प्रदुषण करणार्या फटाक्यांपासून मुक्त राहून दिवाळी साजरी करता येणार नाही का? नक्कीच येईल. फटाक्याशिवाय दिवाळी ही कल्पनाच काहींना करवत नाही. कारण दिवाळी आणि फटाके यांची संलग्नता मेंदुमध्ये ठामपणे कोरली गेली आहे. पिढ्या न् पिढ्या ती संक्रमित होत गेली आहे.

भारतात अनेक प्रकारचे सण साजरे केले जातात, पण दीपावलीबद्दल काहीतरी वेगळंच आहे. दिवाळीच्या उत्सवाच्या प्रकाशात चमकणाऱ्या प्रकाशाने सर्वांचे जीवन उजळले पाहिजे. प्रत्येक वर्षी जादा फटाके उडविले जातात, ज्यामुळे प्रदूषण शिगेला पोहोचत असते. सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक वेळी फटाके खरेदी करण्यास बंदी घातली आहे, परंतु तरीही लोक आनंदासाठी फटाके फोडतात. यामुळे प्रदूषण वाढते. कधीकधी फटाके अपघाताचे रूप घेऊ शकतात. फटाके फोडून व्यक्ती अनेक प्रकारच्या अपघातांना आमंत्रित करतो, अशा अपघातांमुळे बरेच लोक आपले अमूल्य प्राण गमावतात. आपण फटाकेमुक्त दिवाळी का साजरी करत नाही? ज्यात प्रदूषणाचा काहीच मागोवा नाही. वायुप्रदूषण, भुप्रदूषण व अत्याधिक ध्वनिप्रदूषण होते. दिवाळीदरम्यान सतत फटाक्यांच्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषण होते, ज्यामुळे मनुष्य आणि प्राणी दोघांनाही बरीच समस्या उद्भवत आहे. ज्यायोगे अनेक प्रकारच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. फटाक्यांच्या अचानक आवाजाने मुले घाबरत आहेत. फटाक्यांमुळे मोठा स्फोट होतो, ज्यामुळे प्राणी पक्षी घाबरतात आणि कधीकधी तर ऐकण्याची क्षमताच गमावतात, बहिरे होतात. ध्वनी प्रदूषणामुळे प्रौढांना अस्वस्थ वाटते. दिवाळीत आपण पर्यावरणाला हानी पोहोचविणार नाही, अशा प्रकारे साजरी केली पाहिजे. आजकाल लोक एकमेकांना इको फ्रेंडली दिवाळी म्हणून शुभेच्छा देतात. इको फ्रेंडली दिवाळी म्हणजेच पर्यावरण अनुकूल आहे. दिवाळी हा सण आहे, ज्यात आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांसह साजरा करतो. फटाक्यांच्या मागे जर आपण आपले हजारो रुपये खर्च न करता त्याची निराधार आणि गरजूंना मदत केली तर आपली दीपावली शुभ व अपार आनंदाने भरून जाईल. दीपोत्सव खऱ्या अर्थाने आनंदोत्सव प्रतित होईल. गरजू लोकांना कपडे आणि मिठाई भेट द्या. अनाथ आश्रमात जा आणि मुलांना आवश्यक वस्तू भेटी म्हणून द्या. त्यांच्याबरोबर वेळ घालवा, त्यांच्यात रमा. आपल्या घरांना प्रकाश देण्यासाठी दिवे लावा. आपण घरी चिकणमातीचे दिवे रंगवू शकता आणि सजावट करू शकता. आपण घरात बसू इच्छित असल्यास आपण अद्वितीय, सुंदर स्कायलाईट-आकाशकंदील बनवू शकता, आपण घरे आकर्षक असे सजवू शकता. दिवाळीच्या दिवशी संपूर्ण घरात दिवे उजळा म्हणजे जीवनातील अंधकारमय त्रास दूर होईल. बहुतेक लोक सजावटीसाठी इलेक्ट्रॉनिक्स दिवे वापरतात, यात जास्त वीज वापरली जाते. त्याच्या जागी आम्ही एलईडी लाइट वापरू शकतो. दिवाळीच्या दोन दिवसांत आपण आणि आपले नातेवाईक पर्यावरण सहलीला जाऊ शकतो.

त्यानंतर घरी येऊन आपण साखर, कोरडे फळे, हरभरा पीठ, रवा यांसारख्या पदार्थांचा वापर करून वेगवेगळ्या प्रकारची मिठाई बनवू शकतो. रंगीत मिठाईंचे मिश्रण बाजारात बर्याचदा पारखले जाते. हे टाळण्यासाठी घरी बसून भोजन करा आणि आपल्या शेजारच्या लोकांना खायला द्या. दिवाळीत आपण सर्वजण घराची सामग्री आणि बागेच्या फुलांचा वापर करून एकत्र रांगोळी बनवू शकतो. आम्ही कला आणि हस्तकला सामग्रीचा वापर करून विचित्र आणि अद्वितीय सजावट देखील करू शकतो. आपण ही दिवाळी फटाके न पेटवता आपल्या प्रियजनांशी प्रेमाने साजरी करू शकतो. पाहुण्यांना मिठाई देण्यासाठी आम्ही केळीची पाने ही प्लास्टिक व कागदी प्लेटऐवजी वापरली पाहिजेत. कारण केळीची पाने आरोग्यवर्धक आहेत, यामुळे भुप्रदूषण होत नाही. आपण विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करू शकतो आणि दिवाळीचा उत्सव रंगीबेरंगी बनवू शकतो.

दीपावलीच्या शुभप्रसंगी फटाके जाळण्याची गरज नाही. यामुळे पृथ्वीवर समस्या उद्भवतात. हवेला दूषित केल्याने मानवाचे आणि प्राण्यांचे आयुष्य समस्यांच्या चक्रात अडकते. फटाक्यांचे दुष्परिणाम जाणूनही मानव स्वतःचा विनाश स्वतःच करू लागला आहे. लोकांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. पर्यावरणपूरक दिवाळी आपला उत्सव अधिक चांगला व मजेदार करू शकते. फटाके जाळून आम्ही क्षणिक आनंदासाठी प्रचंड आणि भयंकर प्रदूषणाला आमंत्रित करत असतो, हे विसरता कामा नयेच! कालसुसंगत नसलेल्या अनेक प्रथा व परंपरा आज पाळल्या जातात. खरे तर कालबाह्य रुढी-परंपरा या एक प्रकारच्या अंधश्रद्धाच नाही का? मनाला वाटणार्या असुरक्षिततेमुळे ते मोडण्याचे धाडस आज बर्याच लोकांना होत नाही. अंधश्रद्धा निर्मुलनाची चळवळ ही एक व्यापक समाज परिवर्तनाची चळवळ आहे. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलन समिती फटाकेमुक्त दिवाळीचे अभियान नेहमी राबवते. विद्यार्थ्यांतही पर्यावरण जागृतीचे प्रमाण वाढू लागल्यामुळे त्यांना फटाकेमुक्त दिवाळीचे महत्त्व पटू लागले आहे. काही सुसंस्कृत पालकही आपल्या मुलांना फटाक्यांचे दुष्परिणाम पटवून त्यापासून परावृत्त करू लागले आहेत. डॉ.नरेंद्र दाभोलकरांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी काही युवकांनी व विद्यार्थ्यांनी स्वतःहून फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचे ठरवले आहे. पाहू या, काय होते ते?

!! मनमस्तिष्कात प्रकाश पाडणाऱ्या प्रकाशोत्सवाच्या सर्व सूज्ञ भारतीय नागरिकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छाजी !!

- श्री. कृष्णदास निरंकारी- बापू.
गडचिरोली, ९४२३७१४८८३

कराड हा जिल्हा करणारच- आ.पृथ्वीराज चव्हाण

कराड दक्षिण विधानसभा मतदार संघातील काँग्रेस आघाडीच्या प्रचाराचा विंग येथे शुभारंभ

अक्षराज : धर्मेंद्र वर्पे

दि.३१, कराड (सातारा) : १९९१ साली मला तुम्ही आशीर्वाद दिला. पहिल्यांदा मी नवखा म्हणून तुमच्यासमोर आलो.आणि तुम्ही मला पदरात घेतल्याने माझी खासदार म्हणून सुरुवात झाली. केंद्रीय मंत्री आणि काँग्रेस पक्षात मोठा मान मिळाला. आणि मुख्यमंत्री म्हणून मी तुमच्या सेवेत आलो. मुख्यमंत्री असताना कराड दक्षिणेचा सर्वांगीण विकास केला.कराड जिल्हा म्हणून विकसित करण्यासाठी सर्व सोयी उभ्या केल्या. गेल्या दहा वर्षात अस्थिर व भाजपचे सरकार असल्याने मर्यादा होत्या. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर कराड हा जिल्हा करणारच, असा ठाम विश्वास राज्याचे माजी मुख्यमंत्री आ.पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला.

विंग येथील काँग्रेसच्या प्रचार शुभारंभ विराट सभेस मतदारसंघातील मतदारांनी अलोट गर्दी केली होती. संयोजकांनी मतदारांना खुर्चीवर बैठक व्यवस्था केली होती.त्या खुर्च्या फुल्ल होवून हजारो मतदारांनी उभे राहून सभा ऐकली.त्यांना सभेचे थेट प्रक्षेपण करण्यासाठी स्क्रीन लावल्या होत्या.स्क्रीन वरील थेट प्रक्षेपण पाहत पूर्ण वेळ मतदार सभास्थळी उपस्थित होते.

विंग (ता.कराड) येथील ग्रामदैवत श्री हनुमान मंदिरात कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रीय काँग्रेस व घटक पक्षाच्या महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.पृथ्वीराज चव्हाण यांच्या निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ नारळ फोडून करण्यात आला. यानंतर झालेल्या विराट सभेत ते बोलत होते. श्रमिक मुक्ती दलाचे नेते डॉ.भारत पाटणकर, ॲड उदयसिंह पाटील - उंडाळकर, प्रदेश युवक काँग्रेस उपाध्यक्ष शिवराज मोरे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.सुरेश जाधव, अविनाश मोहिते, आदिराज पाटील - उंडाळकर, राजेंद्र शेलार, भानुदास माळी, नितीन काशीद, शशिराज करपे, मनोहर शिंदे,आप्पासाहेब गरुड, अजितराव पाटील - चिखलीकर, प्रा.धनाजी काटकर,युवा नेते इंद्रजित चव्हाण, पैलवान नानासाहेब पाटील, जयवंतराव उर्फ बंडानाना जगताप, शिवाजीराव मोहिते, ॲ ड.नरेंद्र नांगरे - पाटील, शंकरराव खबाले, प्रदीप पाटील, राजेंद्र चव्हाण, अशोकराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

ते म्हणाले, राज्यात भयभीत सरकार आहे.रोजगार नसल्याने लोकं हवालदील झाले आहेत. युवकांसमोर सामाजिक प्रश्न उभा राहिला आहे.महागाईने सर्वसामान्य लोकांचे कंबरडे मोडले आहे.सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची कुचंबना झाली आहे. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीत सत्तांतर झाल्याशिवाय राहणार नाही.

निवडणुकीत महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे.

ते म्हणाले, मी मुख्यमंत्री असताना कराड दक्षिणमध्ये अठराशे कोटीची कामे केली. गेल्या दहा वर्षात विकासकामे करताना मर्यादा आल्या, दरम्यान च्या काळात महाविकास आघाडीचे सरकार असताना चांगला निधी आणता आला त्यानंतर महायुती सरकार असले तरी जवळपास १४०० कोटी रुपयांची विकासकामे केली. कोणता निधी कसा आणायचा याचा मुळातच सरकारचा व प्रशासनाचा अभ्यास असल्याने जास्तीत जास्त निधी आणण्यात यश आले. येणाऱ्या काळात कराड दक्षिणेत पुन्हा तोच विकासाचा डोंगर उभा करायचा आहे कारण आता आपले महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे.यापुढे कराड शहर व ग्रामीण भागातील राहणीमानाचा दर्जा कसा वाढेल,यासाठी माझा प्रयत्न आहे. आ.चव्हाण म्हणाले, लोकसभेतील पराभवानंतर महायुती सरकारला लाडकी बहीण आठवली याआधी कधी हि योजना सुरु करावी असं वाटलं नाही.या योजनेचे पहिल्यापासून च आम्ही स्वागत केले आहे.कारण या योजनेची सुरुवातच आमच्या कर्नाटकमधील काँग्रेसच्या सरकारने केली. आम्हीही ही योजना सुरू ठेवू,व महिना दोन हजार देवू.हे करताना उपकाराची भाषा न करता महिलांचा आत्मसन्मान जपणार आहोत. यशवंतराव मोहिते आणि विलासकाका यांनी विकसित केलेल्या मतदारसंघात मी भर घातली.कराड परिसरात आयटी हब योजनेखाली कंपन्या आणणे, हे आमचे उद्दिष्ट आहे. पायाभूत सुविधा आपल्याकडे असल्याने कराड परिसरात हे स्वप्न पूर्ण करता येईल. उद्योगाचे क्षेत्र उभे करण्याचे माझे स्वप्न आहे.यातून ग्रामीण भागातील राहणीमानाचा दर्जा सुधारण्याचा माझा प्रयत्न आहे. आ.चव्हाण म्हणाले, कराडच्या मातीने देशाला विचार दिला.या मातीचा विचार आणि लीडरशीप जपण्याचा माझा सदैव प्रयत्न राहील. त्यासाठी भाजपचा पराभव करायचा आहे. जुन्या व्यवस्थेकडे आपल्याला जायचे का,याचाही आपल्याला विचार करायचा आहे.

डॉ.भारत पाटणकर म्हणाले, मोदी सरकारचे एजंट इथे बसले आहेत.त्यांना पराभूत करायचे आहे. पुढील वर्षी सामान्य माणसाच्या खिशातील धन वाढायचे असेल, तर महाविकास आघाडीचे सरकार आले पाहिजे. शेतकऱ्यांनी निर्माण केलेले शंभर रुपये अंबानी व अदानीसारख्या पंचवीस घराण्यां च्या खिशात जातात.हे मोठे दुःख आहे. राज्यातील शेतकरी सुखी राहिला पाहिजे, याकरिता पृथ्वीराज चव्हाण यांना प्रचंड मतांनी विजयी करावे. अविनाश मोहिते म्हणाले, विरोधी उमेदवाराच्या वयापेक्षा पृथ्वीराज बाबांना समाजकारणाचा अनुभव फार मोठा आहे.निवडणुकीच्या हलग्या वाजायला लागल्या की, भोसलेंचा तमाशा उभा राहतो. त्यांची कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील पराभवाची हॅट्रिक करण्यासाठी सर्वांनी कंबर कसावी.

(ॲ ड. उदयसिंह पाटील - उंडाळकर म्हणाले, कराड दक्षिण मतदारसंघाने धनदांडगे व सर्वसामान्य लोकांमधील संघर्ष पाहीला आहे.विलासकाकांनी सर्वसामान्य लोकांसाठी वैचारिक संघर्ष केला. सरंजामदार लोकं जनतेला पिळून काढतील, याकरिता काकांनी संघर्ष केला. जयवंतराव जगताप म्हणाले, कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे ऊसाचे बील मिळालेले नाही.रयत कारखान्यापेक्षा कृष्णा कारखान्याचा दर कमी आहे. शिवराज मोरे म्हणाले, रेठऱ्याचा पुल दुरुस्त करत नवीन पुल व प्राथमिक आरोग्य केंद्राचा विकास पृथ्वीराजबाबांनी केला.

प्रा. धनाजी काटकर म्हणाले, विलासराव पाटील - उंडाळकर यांनी सामान्य माणसाला सत्तेत बसवले. विरोधक ज्या लोकांना रोजगार देतात. त्यांना गुलाम बनवून वापरत आहेत.

अजितराव पाटील - चिखलीकर म्हणाले, भोसले कुटुंबाने काँग्रेसचा विचार गाडला. यशवंतराव मोहिते व आबासाहेब मोहिते यांच्याशी गद्दारी केली. त्यांना जनता कधीच निवडून देणार नाही.भानुदास माळी, मनोहर शिंदे, चंद्रकांत खबाले, नितीन काशीद, सुधाकर शिंदे यांची भाषणे झाली. यावेळी अविनाश कापूरकर (रेठरे बुद्रुक), ओंकार माने (कराड) यांच्यासह अनेकांनी आ.पृथ्वीराज चव्हाण यांना पाठिंबा दिला.

शंकरराव खबाले यांनी प्रास्ताविक केले.बाबुराव खबाले व दिपक तडाखे यांनी सूत्रसंचालन केले.अशोकराव पाटील यांनी आभार मानले.

निवडणूक निरीक्षक नरिंदर सिंग बाली यांनी घेतला निवडणूक कामकाजाचा आढावा

दि.३१, मुंबई : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १६५- अंधेरी पश्चिम विधानसभा मतदारसंघात केंद्रीय निवडणूक निरीक्षक नरिंदर सिंग बाली यांनी भेट देऊन निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेतला.

२०१९ च्या विधानसभा व २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत अधिकाधिक मतदान होणे हे भारत निवडणूक आयोगाचे उद्दीष्ट आहे. जनजागृतीद्वारे मतदानाचा टक्का वाढवणे यासाठी विविध संस्था, प्रसिद्ध व्यक्ती, स्थानिक कलाकार आणि यू-ट्यूबर्सच्या माध्यमातून मतदारांना आवाहन करण्याबाबत श्री. बाली यांनी सूचना दिल्या.

या बैठकीत १६५- अंधेरी पश्चिम विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली परदेशी-ठाकूर यांनी सादरीकरण केले. बैठकीला सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी स्नेहलता स्वामी, सहाय्यक आयुक्त के/पश्चिम विभागाचे श्री. चक्रपाणी आल्ले, सहाय्यक पोलिस आयुक्त मुगूटराव आणि कल्पना गाडेकर यांच्यासह अतिरिक्त निवडणूक निर्णय अधिकारी पूजा सुखटणकर, अजय भोंडवे व इतर निवडणूक अधिकारी उपस्थित होते.

वैशाली परदेशी - ठाकूर
१६५ अंधेरी पश्चिम विधानसभा मतदार संघ

मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी जनतेचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. हा निवडणूक उत्सव मतदानाचा टक्का वाढवून साजरा करूयात, असा आशावाद केंद्रीय निवडणूक निरीक्षक नरिंदर सिंग बाली यांनी व्यक्त केला. तसेच, त्यांनी श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठ, जुहू संकुल येथील १६५-अंधेरी पश्चिम विधानसभा मतदारसंघातील स्ट्राँग रुमला भेट देऊन विविध कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी चर्चा केली आणि मार्गदर्शन केले.

सर्व नागरिकांना दीपावली तसेच पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...!
दीपावली शुभचिंतन
तेजस अविनाश पाडळकर
संचालक : उज्वला कंस्ट्रक्शन प्रा.लि.
मो.९०७५९८३८८५/७७९८३७१८१८

सर्व नागरिकांना दीपावली तसेच पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...!
शुभ दीपावली
श्री.एन.एस.स्वामी
कनिष्ठ अभियंता
जि.प.(बांध.) उपविभाग,उदगीर

कालिका LED WALL
सर्व नागरिकांना दीपावली तसेच पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...!
AVAILABLE FOR RENT
- LED Wall Best Quality
- Jimi Crane 36 Ft
- Drone 4K
- HD & Full HD Mixer
- Live Setup
KALIKA STUDIO
|लग्न समारंभ|साखरपुडा|बर्थडे पार्टी|
CONTACT
ASHISH TAMBATKAR 9421300800 RUSHI TAMBATKAR 9421300900

सर्व नागरिकांना दीपावली तसेच पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...!
शुभदिपावली
श्री.सुनिल झुंभाड
शिवसेना विधानसभा डहाणू अध्यक्ष

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते सुनिल पाटील नाराज ?

अक्षराज : मानसी कांबळे

दि.३१, खोपोली : सध्या सर्वत्र निवडणुकीची धामधुम असुन अर्ज छाननीनंतर आता माघारीची वाट पाहिली जात आहे. दरम्यान, विजयाचा गुलाल आपणच उधळावा यासाठी सर्वच पक्ष व उमेदवार जोरदार मोर्चेबांधणी करीत असल्याचे दिसून येत आहे. यातच विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेले शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा खोपोली नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष डॉ. सुनिल गोटीराम पाटील नाराज असल्याची माहिती सुत्रांकडून मिळत आहे. यंदा विधानसभा लढवायचीच...उध्दवसेनेची मशाल कर्जत-खालापूर मतदार संघात पेटवावी, यासाठी डॉ. सुनिल पाटील पेटले होते. पक्ष फुटीपासून कर्जत-खालापूर तालुक्यात उध्दवसेना वाढविण्यात सुनिल पाटील यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. मात्र, असे असतानाही पक्षश्रेष्ठींकडून तिकीट नाकारण्यात आल्याने सुनिल पाटील पक्षाला अखेरचा 'जय महाराष्ट्र' करण्याच्या मनस्थितीपर्यंत पोहचले असल्याची माहिती एका नेत्यांकडून देण्यात आली आहे.

डॉ. सुनिल पाटील काही नेते व हजारो कार्यकर्त्यांसह तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातुनही काही नेते व कार्यकर्ते सुनील पाटील यांच्यासह लवकरच 'भगवा धनुष्य' खांद्यावर घेतील अशी शक्यता राजकीय समिक्षकांकडून वर्तवली जात आहे. दरम्यान, सुनिल पाटील आणि विजय हे मागील अनेक निवडणुकांचे सूत्र झाल्याने सुनिल पाटील आ. महेंद्र थोरवे, सुधाकर घारे व किरण ठाकरे यांच्यापैकी कुणाला साथ देणार? याकडे संपूर्ण कर्जत-खालापुर मतदार संघाचे लक्ष लागुन राहिले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर खोपोली नगर परिषद निवडणुकीचा देखील धुरळा उडणार आहे. नगराध्यक्ष असताना सुनिल पाटील यांनी खोपोली शहराच्या विकासाला चालना दिली होती. मात्र, मागील काही वर्षात खोपोली शहराच्या विकासाला खिळ बसली आहे, या पार्श्वभूमीवर आमदार नाही तर नगराध्यक्ष म्हणून सुनील पाटील विराजमान व्हावेत, अशी खोपोलीकरांची इच्छा आहे. याच राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर सुनील पाटील कोणता झेंडा हाती घेणार ? आमदार म्हणून कुणाला निवडून आणणार? कुणाचा सुफडा साफ करणार? याकडे संपूर्ण कर्जत-खालापूर तालुक्याचे लक्ष लागू राहिले आहे.

सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांना मंत्रालयात मुख्य सचिव यांच्याकडून अभिवादन

दि.३१, मुंबई : सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंत्रालयात आज मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी समग्र शिक्षा अभियानाच्या राज्य प्रकल्प संचालक आर. विमला, सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव दिलीप देशपांडे यांच्यासह मंत्रालयातील व पोलीस विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय एकता दिवस आणि राष्ट्रीय संकल्प दिवसानिमित्त मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली.

दोस्तीच्या दुनियेचा राजा माणूस म्हणजे अभीदादा...

लोहोम सारख्या ग्रामीण भागात सर्वसामान्य कुटुंबातील कर्तृत्व नेतृत्व वक्तृत्व व दातृत्व या आपल्या अजोड गुणांच्या जोरावर तालुक्याच्या राजकारणात अल्पावधीत आपला ठसा उमटवणारे राजकारणापेक्षा समाजकारणाला जास्त महत्व देऊन वयाच्या विशीतच राजकारणाचे धडे गिरवीत समाजाशी गावाशी आपुलकीचे नाते निर्माण करणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणजे अभिजीत आत्माराम गायकवाड म्हणजे तुम्हा आम्हा सर्वांचा लाडका अभिदादा....

गावातील विकास कामासाठी ग्रामपंचायत मधील सरपंच व सर्व सहकाऱ्यांशी खेळीमेळीच्या वातावरणात राहणारा, वेळप्रसंगी धडाकेबाज निर्णय घेणारे ग्रामस्थांच्या मूलभूत गरजा व विकासाला प्राधान्य देण्याची वृत्ती सुखदुःखात वेळ प्रसंगी धावून जाऊन समस्या सोडवण्याची समय सुचकता व प्रसंगावधान राखून तोडगा काढण्याची निर्णय क्षमता यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मनात अभिजीत दादाचे स्थान अढळ होते. त्यामुळे आज वर्षानंतरही ते लोकांच्या हृदयात घर करून आहेत.समाजसेवेचे बाळकडू घरापासूनच मिळाले असल्याने अभिदादाची मैत्री ही एका व्यक्ती किंवा घरापुरती मर्यादित कधीच राहिली नाही पंचक्रोशी बरोबर तालुक्यातील सर्व राजकीय पक्षातील प्रमुख नेते पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी त्यांचे संबंध हे समान अंतरावर होते त्यामुळे अल्पावधीत त्यांनी मित्रांचे संघटन करून मित्र परिवारामध्ये आपले वेगळे वलय निर्माण केले.लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळ्यांशी त्याच्या दिलदार स्वभावामुळे त्याचे विचार जुळायचे त्यांची मैत्री केवळ बेगडी, दिखाऊपणाची नव्हती तर प्रत्येकाच्या काळजाला भिडणारी होती आणि ती त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत जपली. कोरोनाच्या काळात कोणीही कोरोना रुग्णांना प्रवासी सुविधा देत नव्हते. त्यावेळी अभिजीतने केलेली मदत ही न विसरणारी आहे त्याचा प्रवासी सेवेचा व्यवसाय असल्याने त्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता कोरोनाग्रस्त रुग्णांची घर ते हॉस्पिटल व पुन्हा घर अशी सेवा दिली.एवढेच नाही तर परजिल्ह्यात व परराज्यातही त्यांनी कोरोना काळात रुग्णांची केलेली सेवा ही एखाद्या देवदूताप्रमाणेच होती.गाव परिसर व तालुक्यातील जनतेला तो आपल्या घरातीलच सदस्य वाटायचा राजकारण समाजकारण शेती प्रवासी वाहतूक इत्यादी सर्व बाबी सांभाळून त्यांनी क्रिकेट खेळण्याचा एक छंद जोपासला होता अष्टपैलू खेळाडू म्हणून त्याचा नावलौकिक होता त्याने अनेक करंडक जिंकले होते परंतु काही वेळा समाजामध्ये आपण पाहतो की समाजासाठी वेळ देणाऱ्या व्यक्ती आपल्या आरोग्याकडे शरीर स्वास्थ्याकडे दुर्लक्ष करतात.आणि हेच कारण ठरलं अभिजीतच आपल्यातून जाण्याचं.सोमवार दिनांक १३ नोव्हेंबर २०२३ सकाळी मंडलेश्वराचे सपत्नीक दर्शन घेऊन,आईशी गप्पा मारून अभिजीत क्रिकेट खेळायला गेला पाटीत चमक भरल्याचे निमित्त झालं मित्रमंडळींनी ताबडतोब हॉस्पिटलला नेले. प्राथमिक उपचार करून घरी जात असताना वाटेतच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अभिजीतची प्राणज्योत मालवली.कोरोनाच्या काळात २४ तास प्रवासाची सुविधा देणारा व लोकांचे प्राण वाचविणारा अभिजीत काळाच्या पडद्याआड गेला. हॉस्पिटलमध्ये तालुक्यातील मित्रपरिवार लोहोम व पंचक्रोशीतील ग्रामस्थ हजारोच्या संख्येने जमले ते आपल्या जिवाभावाच्या मित्राचे शेवटचे दर्शन घेण्यासाठी अंत्यविधीला जमलेला जनसागर पाहता त्याचे मित्रपरिवार सगे सोयरे यांच्याशी किती घनिष्ठ संबंध होते ते जाणवले. अभिजीत चे निधन झाले त्या दिवशी लोहोमच्या ग्रामदैवताची यात्रा होती. दिवाळीचा सण होता घरोघरी यात्रेची व सणाची लगबग सुरू होती.सर्व घरावर विद्युत रोषणाई होती मात्र त्यांच्या निधनाची वार्ता समजताच सर्व ग्रामस्थांनी घरावरील विद्युत रोषणाई काढून टाकली.त्यादिवशी लोहोम गावात अक्षरशः चुलीही पेटल्या नव्हत्या.सर्व ग्रामस्थ बंधू-भगिनी मित्रपरिवार शोक सागरात बुडाले होते. गावात निरव शांतता पसरली होती. प्रत्येक जण हळहळ व्यक्त करत होते. प्रचंड दुःखामुळे सर्वांना अश्रू अनावर झाले होते.गावच्या ग्रामदैवताची यात्रा रद्द करून दुखवटा पाळणारे लोहोम गाव खरंच एक माणुसकीचा प्रेमाचा अखंड वाहणारा निर्झर आहे. लोहोमवासियांनी जपलेली माणुसकी आदर्शवतच. अभिजीतच्या निधनामुळे त्याच्या कुटुंबातील पत्नी,मुलगी,आई वडील,भाऊ भावजया,सर्व चुलते चुलत भाऊ त्यांचा परिवार पोरके झालेच परंतु खंडाळा तालुका एका उमद्या नेतृत्वाला मुकला आहे कारण त्याच्या नेतृत्वगुणांमुळे व संघटन कौशल्यामुळे तो तरुणांच्या गळ्यातील ताईत बनला होता त्याच्या जाण्यामुळे निर्माण झालेली उणीव पोकळी कधीच भरून निघणार नाही.आपण सर्वजण त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीमागे सक्षम आणि उभे राहून त्यांना आधार देणे हीच त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली ठरेल. अभिजीतच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.

: शब्दांकन :

प्रा.श्री डी.व्ही.गायकवाड सर
पंचक्रोशी विद्यालय जवळे लोहोम फाटा.

थोडक्यात बातम्या

स्व.रतन टाटा यांना अनोख्या पद्धतीने आदरांजली

अक्षराज : आदिनाथ देशमुख

दि. ३१, कोपरखैरणे (नवी मुंबई) : दिवाळी सणाचे औचित्य साधुन सेक्टर -१९ कोपर खैरणे गावातील 'स्पॉट बॉईज मित्र मंडळा' तर्फे प्रसिद्ध उद्योगपति स्वर्गीय रतन टाटा यांना अनोखी आदरांजली वाहणारा आकाश कंदील साकारन्यात आला आहे. ३÷४ फुट आकाराचा सदर आकाश कंदील रणजित पाटील आणि चेतक पाटील यांच्या संकल्पनेतुन ' स्पॉट बॉईज ' च्या सर्व सदस्यांची मदत घेऊन बनविण्यात आला आहे . संध्या सदर आकाश कंदील सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. दरम्यान, गतवर्षी दिवाळी सणावेळी आय सीसी वर्ल्ड कप क्रिकेट सामान्यांचा थरार सुरू होता. त्या अनुषगाने 'स्पॉट बॉईज मित्र मंडळा' तर्फे विश्वचषकाची प्रतिकृति साकारण्यात आली होती. स्पोर्ट बॉईज मित्र मंडळ चे कोपरखैरणे गावातून कौतुक होत आहे.

एव्हरेस्ट सर करणाऱ्या गिर्यारोहक काम्याचे राज्यपालांकडून कौतुक

दि.३१, मुंबई : अवघ्या सोळाव्या वर्षी माऊंट एव्हरेस्ट सर करणाऱ्या गिर्यारोहक काम्या कार्तिकेयनचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज अभिनंदन केले.

काम्याने बुधवारी (दि. ३०) आपले वडील कमांडर एस कार्तिकेयन व आई लावण्या यांचेसह राज्यपालांची भेट घेऊन त्यांना आपल्या एव्हरेस्ट व इतर शिखर गिर्यारोहण अनुभवाची माहिती दिली.

मे महिन्यात काम्याने नेपाळमधून माऊंट एव्हरेस्ट सर करुन भारतातील सर्वात तरुण आणि जगातील दुसरी सर्वात तरुण गिर्यारोहक होण्याचा मान मिळवला, असल्याचे तिच्या वडिलांनी यावेळी सांगितले.

मुंबईच्या नेव्ही चिल्ड्रन शाळेची बारावीची विद्यार्थिनी असलेल्या काम्याने मिशन साहस अंतर्गत प्रत्येक खंडातील सर्वोच्च शिखरावर चढाई करण्याचा तसेच दोन्ही ध्रुवांवर स्की करण्याचा संकल्प केल्याचे तिने सांगितले.

जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीत २५९ उमेदवारांचे अर्ज शिल्लक

३० जणांचे अर्ज बाद ; अर्ज माघारी घेतल्यानंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार



अक्षराज : वसंत रांधवण

दि.३१, अहिल्यानगर : विधानसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघात २८९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. दाखल अर्जांची काल, बुधवारी छाननी प्रक्रिया पार पडली. त्यातील फक्त ३० उमेदवारांचे अर्ज बाद करण्यात आले असून एकूण २५९ उमेदवारांचे अर्ज शिल्लक आहेत. पात्र उमेदवारांची यादी त्या त्या मतदारसंघात प्रसिध्द करण्यात आली आहे. दरम्यान, बहुतेक अर्ज वैध असल्याने आता अर्ज माघारीकडे मतदारांचे लक्ष लागले आहे.

सोमवार, ४ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असून सोमवारनंतरच विधानसभा निवडणुकीचे खरे चित्र समोर येणार आहे. काल, बुधवारी अर्ज छाननीत बाद झालेल्या अर्जांमध्ये डमी अर्जांचाच अधिक समावेश आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रमुख उमेदवारांचा समावेश नाही. आवश्यक कागदपत्रे नसलेले अर्ज बाद झाले आहेत. बहुतेक अर्ज वैध असल्याने आता अर्ज माघारीकडे मतदारांचे लक्ष लागले. काही अर्जांबाबत हरकती आल्याने त्यावर सुनावणी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. उमेदवार व हरकत घेतलेल्या व्यक्तींची बाजू वकिलांमार्फत संबंधीत निवडणुक निर्णय अधिकारी यांनी ऐकुण घेतली व त्यानंतर अर्ज वैध, अवैध याबाबत निर्णय दिला.

दरम्यान, उमेदवारांमध्ये बंडखोरांची संख्या अधिक आहे, हेच या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. अशा उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी प्रमुख उमेदवारांची दमछाक होणार आहे. अर्ज बाद होऊ नये, म्हणून बहुतेक उमेदवारांनी स्वतंत्रपणे वकिलाची नियुक्ती केली होती.

अर्जातील त्रूटींबाबत अधिकार्यांनाही विश्वासात घेऊन अर्ज भरले जातात. त्यामुळे अर्जात सहसा चुका दिसून आल्या नाहीत. काही अपवाद वगळता अर्ज बाद होण्यामध्ये टेक्निकल बाब असल्याचे दिसून येते. बहुतेक उमेदवार डमी अर्थही भरतात. ते अर्ज बाद केले जातात. प्रमुख पक्षाच्या उमेदवारांचे अर्ज दाखल करताना विशेष काळजी घेतली असल्याचे दिसून येत आहे. निवडणूक अर्जासोबत पक्षाचा एबी फार्म न जोडता पक्षाच्या नावाने जोडलेले अर्ज बाद करण्यात आले. जिल्ह्यात अनेक मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीकडून निवडणुकीसाठी इच्छुक असणाऱ्यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी अपक्ष म्हणून भरलेले आहेत. ते शेवटपर्यंत आपल्या भूमिकेवर ठाम राहणार की ऐनवेळी माघार घेणार हे पहाणे महत्त्वाचे ठरणार आहे.

वैध ठरलेले मतदारसंघानिहाय उमेदवार
(कंसात अवैध)

अकोले १३ (१), पारनेर २१ (१), संगमनेर १६ (१), शिर्डी १५ (३), कोपरगाव २० (१), श्रीरामपूर ३१(३), नेवासा २४ (०), शेवगाव ३६ (९), राहुरी २७ (३), अहमदनगर शहर २७ (३), श्रीगोंदा ३६ (५), कर्जत- जामखेड २३ (०) एकूण अर्ज २८९ (३०)

ठाण्यातील दिवाळी पहाट कार्यक्रमात नवमतदारांनी, नागरिकांनी मतदानाचा केला संकल्प

अक्षराज : प्रतिनिधी

दि.३१, ठाणे : दिवाळीत जसे प्रत्येक घरात दीप प्रज्वलन केले जाते. तसेच प्रत्येक नागरिकाने आपल्या मताचा दीप लोकशाहीच्या निवडणूकरुपी उत्सवात लावावा. त्यातून देशाचे भवितव्य अधिक उज्ज्वल, पारदर्शक आणि न्याय होईल, असा संदेश देत तलावपाळी येथे आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमात मतदारांनी मतदान करण्याचा संकल्प केला आणि शपथ घेतली. तलावपाळी परिसर येथे आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमात १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले.भारतीय राज्यघटनेने मला मतदान करण्याचा अधिकार दिला आहे. त्याचा कोणत्याही परिस्थिती वापर करेन. मतदान करून उमेदवार निवडणे माझी राष्ट्रीय जबाबदारी आहे. देशहिताकरिता जनतेच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करू शकणाऱ्या सर्वोत्तम उमेदवाराची निवड करण्यासाठी माझ्या कुटुंबातील सदस्यांना, परिचितांना मतदान करण्यासाठी प्रेरित व प्रोत्साहित करीन. कोणतीही भीती वा लालसोपोटी मतदान करणार नाही, असा संकल्प उपस्थित सर्व मतदारांनी केला. युवा वर्गाने वेशभूषाच्या माध्यमातूनराष्ट्राच्या हितासाठी करायचं मतदान.., एकतेने एकजुटीने गाजवूया मैदान.., लोकशाहीचा करूया सन्मान.., १०० टक्के करायचं मतदान...अशी आगळीवेगळी वेशभूषा मतदार जागृती सर्वाचे लक्ष वेधून घेत होती. नवमतदार तरुणाईला, मतदानाचा हक्क न बजावणाऱ्या मतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून मतदार जागृती केली जात होती.लोकशाहीमध्ये प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे. याचा वापर योग्य पद्धतीने करण्याची जबाबदारी प्रत्येक मतदाराची आहे. कोणत्याही अमिषाला बळी न पडता योग्य उमेदवारास मत देऊन आपले शहर, राज्य आणि देशाच्या विकासात हातभार लावावा आणि दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी प्रत्येकाने आपले राष्ट्रीय कर्तव्य बजवावे, असे आवाहन स्वीप टीमकडून मतदारांना केले जात आहे.

उल्हासनगर विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात भरारी पथकामार्फत १७ लाखांची रोकड जप्त

दि.३१, ठाणे : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १४१ उल्हासनगर विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीची आदर्श आचारसंहिता पालन करण्यासाठी विविध पथके कार्यरत असून, त्याअंतर्गत कार्यरत भरारी पथक क्र. ०६ ने दि.३१ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री सुमारे २.०० वाजता मोठी कारवाई केली. कल्याणकडून मुरबाडकडे वाहन क्र. MH 05 DZ 9911 हे जात असताना संशयास्पद वाटल्याने या वाहनाची तपासणी केली. त्यावेळी त्या वाहनात रु.१७ लाख रोख रक्कम असल्याचे निदर्शनास आले. संबंधित वाहनचालकाची विचारणा केली असता, त्यांनी कोणताही ठोस पुरावा दिला नाही. त्यामुळे ही रक्कम जप्त करुन ती कोषागारात भरणा करण्यात आली व याबाबत आयकर विभागाला कळविले असून या प्रकरणी सखोल तपासणी सुरु आहे, अशी माहिती १४१ उल्हासनगर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विजयानंद शर्मा आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कल्याणी मोहिते यांनी दिली आहे.

सावधान! दिवाळीत मिठाई विक्रेत्यांकडून ग्राहकांची लूट

अक्षराज : प्रतिनिधी

दि.३१, नागपूर : दिवाळीत मोठ्या प्रमाणावर मिठाईसह इतर पदार्थाची विक्री होते. या काळात काही विक्रेते अवास्तव नफा कमावण्यासाठी एकीकडे भेसळ तर दुसरीकडे ग्राहकाला मिठाई डब्यात ठेवून त्याचे वजन करून विकतात. त्यामुळे मिठाईच्या दरात डब्याचीही ग्राहकाला विक्री होते. या फसवणुकीबाबत अ. भा. ग्राहक पंचायतने बरेच मुद्दे मांडले आहे. त्याबाबत आपण जाणून घेऊ या.

दिवाळीमध्ये काही विक्रेते मिठाई, तेल, तुप, खोवा व इतर खाद्यपदार्थामध्ये जास्त नफा कमावण्यासाठी मोठ्या प्रमाणात भेसळ करून नागरिकांच्या जिवांशी खेळतात. या काळात मिठाईसह इतर खाद्य पदार्थाची कोट्यावधींची उलाढाल होते. या पदार्थात भेसळ करण्याचे प्रमाण वाढत असून यावर अंकूश ठेवण्यासह कारवाईची जबाबदारी अन्न व औषधी प्रशासनाची आहे. परंतु थातूर मातूर कारवाई करन वेळ काढला जातो. या भेसळीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दरम्यान जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकांमध्ये वारंवार ग्राहक पंचायतने आवाज उठविल्यावरही थातूर- मातूर कारवाईतून नागरिकांच्या तोंडाला पाने पुसल्या जात असल्याची खंतही अ. भा. ग्राहक पंचायतने प्रसिद्धीपत्रकातून व्यक्त केली. नियमाप्रमाणे विक्रेत्याने फक्त मिठाईचे वजन करुन नंतर ते स्वत:च्या दुकानाची जाहीरात करणाऱ्या डब्यामध्ये ठेवून ग्राहकांना दिले पाहिजे. परंतु विक्रेते डब्यांमध्ये मिठाई ठेवून वजन करून ग्राहकाला देतात.

त्यामुळे मिठाईच्या दरात डब्याची विक्री होऊन ग्राहकाची फसवणूक होत आहे. एका डब्याचे वजन साधारण ५० ते १०० ग्रॅम असते म्हणजे एवढी एवढी मिठाई ग्राहकांना कमी दिली जाते. हा गंभीर प्रकार असतानाही वजनमाप खाते (वैधमापन शास्त्र विभाग) केवळ तमाशा बघतो. तातडीने ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग आणि वैधमापन शास्त्र विभागाकडून अस्थापनांची तपासणी करून दोषींवर कडक कारवाई करायला हवी, अशी मागणी अ. भा. ग्राहक पंचायतचे पश्चिम क्षेत्रीय संघटन मंत्री गजानन पांडे यांनी केली. कारवाई न झाल्यास कारवाईचा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान अन्न व औषध प्रशासन विभाग आणि वजनमाप खाते सतत वर्षभर वादग्रस्त आस्थापनांची तपासणी न करता केवळ सनासुदीतच थातूर मातूर कारवाई करत असल्याने विक्रेते आणि संबंधित विभागाचे साटेलोटे तर नाही ना, असा संशयही अ. भा. ग्राहक पंचायतचे ॲड. स्मिता देशपांडे, श्रीपाद भटटलवार, संजय धर्माधिकारी, गणेश शिरोळे, ॲड. विलास भोसकर, तृप्ती आकांत, संध्या पुनियानी, ॲड. गौरी चांद्रायण आणि इतरही पदाधिकाऱ्यांनी केला.

सर्व नागरिकांना दीपावली तसेच पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...!
शुभ दीपावली
श्री.प्रदीप माधव वाघ
अध्यक्ष : आदिवासी विकास हक्क संघर्ष समिती
उपसभापती : पंचायत समिती मोखाडा
विधानसभा संघटक